विश्व समाज

लेखक
डॉ. इल्तिफात अहमद
(एम.एस.सी.बी.टी. (अलिगड)

भाषांतर
जाहिद आबिद खान

अनुक्रमणिका

विश्वसमाज	४
युरोप	६
अरब	६
हिंदुस्थान	७
आरक्षण	८
आंतरजातीय विवाह	८
बौद्धमताचा स्वीकार	८
ख्रिस्ती धर्माचा स्वीकार	९
अंतिम प्रेषित (पैगंबर)	९
विश्वसमाजाची स्थापना	१२
राज्य व्यवस्था	१५
मानव अधिकार	१७
सामाजिक न्याय	१९
इस्लामचा पुनरुत्थान	२३

''अल्लाह, असीम कृपावंत व दयावंतच्या नावाने''

विश्व समाज

जगातील सर्व लोक मान्य करतात की कोणीतरी या विश्वाचा सृजनकर्ता आहे. तोच या विश्वाचा मालक व संचालक आहे. त्याला कोणी गॉड (God) म्हणतो तर कोणी त्याला खुदा वा अल्लाह किंवा ईश्वर म्हणतो. या सर्व शब्दांचा अर्थ शेवटी एकाच 'शक्ति' शी निगडित आहे. ही बाब समाधानकारक आहे. संपूर्ण विश्वातील 'पृथ्वी' या छोट्याशा ग्रहावर ईश्वराने एका मानवी जोडप्याला पाठविले. त्या जोडप्यास काही लोक मनु व सतरोपा नावाने ओळखतात तर काही त्यांना आदम व हव्वा, तर काही त्यांना ऐडम व ईव्ह असे नांव देतात. जरी नावे वेगवेगळी असली तरी त्यांचा संबंध मात्र त्या एका आद्य जोडप्याशीच आहे. पृथ्वीवर पाठविण्यापूर्वी त्या जोडप्यास निक्षूण सांगण्यात आले होते की पृथ्वी हे तुमचे कायम स्वरूपी व खरे स्थान नसून ते तुमचे परीक्षा-स्थल आहे. जो मनुष्य या जगात ईश्वराच्या आज्ञेनुसार जीवन व्यतीत करील त्यास मरणोपरांत सर्व सुखाने सुसज्ज अशा स्वर्गात प्रवेश दिला जाईल. तेथे त्याला हवे ते सर्व काही प्राप्त होईल. तेथे आजार, वार्धक्य व मृत्युचा प्रश्न निर्माण होणार नाही. मात्र जे लोक ईश्वरीय आदेशाची अवज्ञा करून स्वैराचाराचे जीवन व्यतीत करतील त्यांना मरणोपरांत भयंकर क्लेश व कष्टमय जीवन भोगण्यासाठी नरकांत ढकलून देण्यात येईल. तेथे तप्त अग्नी, साप, विंचू असतील. भूक व तहानेमुळे भयंकर यातना सहन कराव्या लागतील. रक्त व पू प्राशन करावे लागेल. मृत्युही येणार नाही. त्यामुळे दुःखातून मुक्तता ही मिळणार नाही.

आदम व हव्वा यांना पृथ्वी वर पाठवितांना जे सांगण्यात आले होते ते ईश्वर-अवतरित अंतिम ग्रंथ कुरआनांत पूर्णतः सुरक्षित करून ठेवण्यात आले आहे.

''आम्ही तुम्हास सांगितले की तुम्ही येथून खाली उतरा नंतर जर माझ्या कडून तुमच्याकडे काही मार्गदर्शन प्राप्त झाले तर त्याचे जे लोक अनुसरण करतील त्यांना कोणतेच भय व दुःख होणार नाही व जे लोक अनुसरण करणार नाहीत व आमचे वचन खोटे ठरवतील ते नरकाग्नीत झोकले जातील व तेथेच सदैव खितपत राहतील.''

(सूरह २ -आयत ३८, ३९)

आदम व हव्वा याच आदेशानुसार जीवन व्यतीत करीत राहिले. त्यांच्या मृत्युनंतर त्यांची संतान सुद्धा बऱ्याच काळा पर्यंत उपरोक्त ईश्वरीय आदेशांवर अवलंब करीत राहिली. मात्र नंतरच्या काळात काही स्वार्थी लोकांनी ईश्वरीय - आदेशांमध्ये फरक करून त्यांचे मूळ स्वरूप बदलून टाकले. फलस्वरूपात मानवी समाज पथभ्रष्ट होऊ लागला. ईश्वरांने दुसऱ्या प्रेषितांद्वारे आपल्या पूर्वीच्या आदेशांचे पुन:स्मरण करून दिले. त्या आदेशांचे ही लोकांनी स्वरुप बिघडून टाकले. अशा प्रकारे ईश्वरीय आदेश येण्याचा क्रम चालू राहिला व दुष्ट लोक त्यांना विद्रूप करीत राहिले.

मानवास एक संगठित समाजाची गरज होती मात्र ईश्वरीय आदेशांचे मूळ स्वरूप कायम न राहिल्याने सामाजिक संगठण विस्कळित होत गेले.

ईश्वरीय आदेश लुप्त झाल्याने समाजात वेगळीच धारणा निर्माण झाली. कोणी सूर्यास ईश्वर मानू लागला. तर कोणी चंद्राची पूजा करू लागला व काही लोक इतर ग्रहांचे पूजक झाले. अशा प्रकारे समाजात अनेक ईश्वर निर्माण झाले. देशातील सामुहिक जीवनात राज्यकर्त्यांच्या आदेशांचे पालन केले जात असे मात्र जो तो आपल्या मनाला पटेल त्या काल्पनिक देवांची पूजा करू लागला. लोक सूर्य, चंद्र व नक्षत्रांची पूजा तर करीत होतेच मात्र त्यांच्या कडून मानवी जीवना करिता आदेश प्राप्त होऊ शकत नव्हते. राज्यांचे शासन तर राजा महाराजांच्या अधीन होते पण शासकाच्या मनांत सतत चिंता लागून राहत असे की जनता कधीही विद्रोह करून स्वतंत्र होईल. म्हणून इजिप्तच्या राजाने स्वत:स "फिरऔन" (सूर्याची संतान) जाहिर करून टाकले. सूर्य तत्कालीन इजिप्शियन समाजाचा ईश्वर मानला जात होता. म्हणून सूर्याची संतानही ईश्वरा समान मानली जाऊ लागली. अशा तऱ्हेने इजिप्तचा शासक केवळ राजा न राहता जनतेचा पूज्य देवता झाला. इजिप्तचा एकही नागरिक विद्रोह करण्याचे धैर्य करू शकत नव्हता. अशा युक्तीने शासकाने आपल्या शासनास स्थैर्य प्राप्त करून दिले. याच प्रथेचा जपानच्या राजाने अवलंब करून स्वत:स "मिकाडो" (सूर्याची संतान) जाहिर करून टाकले. जपानच्या जनतेने त्यास आपले आराध्य देवता मानून घेतले. एखाद्या जपानी व्यक्तीने विद्रोह केल्यास त्याला मुक्ति प्राप्त करून घेण्याकरिता स्वत:च्याच खंजीराने स्वत:चे पोट चिरून आत्महत्या करावी लागत असे. त्या कृत्यास तेथील भाषेत 'हराकरी' म्हटले जात असे. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात हराकरीचे समाचार वर्तमान पत्रात सतत प्रसारित होत असत. अशा प्रथांपासून भारत अलिप्त राहू शकत नव्हता. म्हणूनच की काय भारताच्याही एका भागांत सूर्यवंशी तर दुसऱ्या भागात चंद्रवंशी राजाचे प्रभुत्व प्रस्थापित झाले.

समाजावर प्रभुत्व स्थापित करण्याचा हा मार्ग यशस्वी झाला. मात्र राज्यकर्त्यांना नेहमीच भीति वाटत असे की एखादा माणूस त्यांच्या प्रभुत्वाला आव्हान देण्यासाठी जनतेला पटवून देईल की ते ईश्वर पुत्र नसून अमुक व्यक्तीचे पुत्र आहेत व अमुक यांचे नातू आहेत. क्षणार्धात संपूर्ण जनता विद्रोही होईल व प्रभुत्वाचा मनोरा जमीन दोस्त होईल. या विचाराने त्रस्त होऊन राजाने समाजाला विविध वर्गात विभक्त करून टाकले. जेणे करून संपूर्ण समाज एकाच वेळी त्याच्या विरुध्द बंड पुकारणार नाही.

इराक : या देशातील लोकांना तीन वर्गात विभक्त करण्यात आले. १) अमीलू (२) मिस्कीन (३) अर्दू

१) अमीलू : या वर्गात देशातील सवर्ण वर्गीय शासक, सेनापति व मंदिराचे पुजारी वगैरे लोक होते ज्यांचा संपूर्ण देशांवर प्रभाव होता.

२) मिसकीनू : हा समाजातील दुसऱ्या स्थानावरील वर्ग होता. ह्या वर्गातील बहुतेक लोक शेतकरी व व्यापारी होते.

३) अर्दू : ह्यात सर्वात निम्न दर्जाचे लोक होते व उच्च वर्गाकडून भरडले जात होते.

युरोप

युरोपातील संपूर्ण समाज तीन वर्गात विभागला गेला होता. १) शासक व धर्मगुरू (पादरी) (२) जमीन मालक (३) सर्फ

शासक व धर्मगुरू उच्च वर्गाचे लोक होते व संपूर्ण समाजाची पिळवणुक करीत होते. विशेषत: सर्फ या निम्नतम वर्गातील लोकांची खूपच पिळवणुक केली जात असे.

अरब

अरब समाज सुध्दा तीन वर्गात विभागला गेला होता.

१) अरबी २) अजमी ३) गुलाम

संपूर्ण अरब समाजात अरबी हा सवर्ण अर्थात उच्चभ्रू वर्ग होता व त्यांच्या कडून संपूर्ण जनतेची पिळवणुक केली जात होती. गुलामांना तर जनावरां पेक्षा वाईट वर्तणुक दिली जात होती. त्यांचा क्रयविक्रयही केला जात असे.

हिंदुस्थान

या बाबतीत हिंदुस्थान सर्वात अग्रस्थानी होता. येथील समाज वर्णव्यवस्थेनुसार चार वर्गात विभागला गेला होता.

१) ब्राम्हण २) क्षत्रिय ३) वैश्य ४) शूद्र

ब्राह्मण समाजाचा सवर्ण वर्ग होता व संपूर्ण देशावर प्रभुत्व गाजवीत होता. शूद्र सर्वात खालचा वर्ग गणला जात होता. ही समाज व्यवस्था जिन्या प्रमाणे होती. सर्वात वरच्याचे स्थान ब्राह्मणाना प्राप्त होते व ते समाजावर वर्चस्व गाजवीत होते. त्यानंतर क्षत्रियांचा क्रमांक होता जे ब्राह्मणाचे गुलाम व इतरांचे सरदार होते. वैश्य, ब्राह्मण व क्षत्रियांच्या अधीन होते मात्र शूद्रांवर वर्चस्व गाजवीत होते. शूद्र मात्र सर्वांचाच गुलाम होता व त्याचे कोणावरच वर्चस्व नव्हते. त्याला समाजाचे सर्वात तुच्छ दर्ज्याचे काम करावे लागत होते.

समाजाची काही कामें तुच्छ असतात मात्र ती ही अत्यंत महत्वाची असतात. ती कामें बळजबरीने करून घेता येतात मात्र स्वेच्छेने कोणीही ती कामें करण्यास तयार होत नाही. म्हणून ही कामे समाजाच्या दुबळ्या वर्गाकडून अर्थात शूद्राकडून करून घेण्यात येत असत. तसेच जो जे काम करील तोच त्याचा कायमस्वरूपी पेशा समजला जात असे. आपला पेशा सोडून कोणीही माणूस दुसरे काम करू शकत नाही, असा सामाजिक नियम निश्चित करण्यांत आला होता. अशा प्रकारे एका वर्गास दुसऱ्या वर्गाचे काम करण्याचा मार्ग बंद करण्यात आला होता. वैवाहिक संबंध केवळ एकाच वर्गातील लोकांत जोडता येत होते. धार्मिक पुस्तकांतही असे लिहिले गेले होते की ब्राह्मणांचा ब्रह्म मुखातून, क्षत्रियाचा दोन्ही बाहूतून, वैश्यांचा पोटातून व शूद्रांचा पायातून जन्म झाला आहे. शूद्रांचा ब्रह्माच्या एकदम खालच्या भागातून जन्म झाला याची जाणीव करून देऊन ते खरोखर नीच आहेत हे पटवून देण्यात आले होते. अशा प्रकारे शूद्रांच्या मनांत इतर वर्गांबाबत क्रोधाची भावना निर्माण होऊ दिली गेली नव्हती, ज्या अर्थी ब्राह्मणाचा जन्म ब्रह्माच्या मुखातून झाला आहे त्या अर्थी त्यांना सर्वश्रेष्ठ होण्याचा सम्मान प्राप्त असल्याची खात्री झाली होती. अशा प्रकारे ब्राह्मणा मध्यें श्रेष्ठत्वाची भावना (Superiority Complex) व शूद्रा मध्ये हीनत्वाची भावना (Inferiority Complex) निर्माण होणे स्वाभाविक बाब होती. या भावनांना अधिक स्थिर व भरीव स्वरूप

देण्याकरिता पुस्तकें लिहिली गेलीत व स्मृति निर्माण करण्यात आली. या सर्व गोष्टींचा ब्राह्मण व शूद्रांच्या मानसिकते वर इतका खोलवर परिणाम झाला की आजही दोहो वर्गातील लोकांना समानते वर विश्वास होत नाही.

ज्या देशातील जनतेत उच्च नीच व स्पृश्यास्पृश्याची भावना अस्तित्वात असते त्या देशातील एकतेला तडा जातो. याच कारणामुळे भारतसरकारने उच्च-नीच व स्पृश्यास्पृश्यतेच्या प्रथे विरुध्द भरीव कामगिरी केली आहे व दलित वर्गीयांनीही आपले सामाजिक स्थान उंचावण्याचे यशस्वी प्रयत्न केले आहेत.

आरक्षण (Reservation)

शासकीय नोकर भरतीत दलितांसाठी आरक्षणाची व्यवस्था केल्याने दलित परिवारांची आर्थिक दशा सुधारत आहे. मात्र त्यांच्या कडे पाहण्याचा दृष्टीकोन अद्याप पूर्णता बदललेला नाही. जगजीवन रामाचा दलित समाजाशी संबंध होता तरीही ते उच्च पदा पर्यंत पोहचले होते. काशी येथे त्यांच्या हस्ते मदन मोहन मालवीय यांच्या तैलचित्राचे अनावरण करण्यात आले होते. मात्र कार्यक्रम संपल्यानंतर काशीच्या पंडितानी प्रतिमा गंगाजलाने धुवून पवित्र केली होती कारण जगजीवन रामाच्या स्पर्शाने ती अपवित्र झाली होती. सांगण्याचे तात्पर्य असे की केवळ आरक्षण व्यवस्थेने दलितांचे कल्याण होणार नाही. समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे.

आंतरजातीय विवाह (Inter Cast Marraige)

लोकांनी आंतरजातीय विवाह करावेत याकरिता बरीच प्रलोभने देण्यात आली आहेत. काही उच्च वर्णीयांनी दलित समाजातील व्यक्तींशी विवाहही केलेत. मात्र असे विवाह पूर्णतः यशस्वी होऊ शकले नाहीत कारण दलित समाजातील व्यक्ति आचार-विचाराने हवा तेवढा प्रगत होऊ शकला नाही. उलट उच्च वर्णीयाचा दर्जा खालावला गेला. त्यामुळे आंतरजातीय विवाहाने दलितांचे उत्त्कर्षपण साधता येईल असे वाटत नाही.

बौध्दमताचा स्वीकार

बऱ्याच दलितांनी आपला सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी आपल्या धर्माचा त्याग करून बौध्द धर्म स्वीकारला. आज या धर्माची ओळख नाहींशी होत चालली आहे. बौध्द धर्माचा स्वीकार केल्याने दलितांचा उध्दार झाला नाही. दलित दलितच राहिला. बौध्द धर्म दलितांची समस्या दूर सारण्यास असमर्थ सिध्द झाला आहे.

ख्रिस्ती धर्माचा स्वीकार

ख्रिस्ती धर्माच्या प्रचारकांच्या प्रयत्नांने कांही दलितांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. मात्र ख्रिस्ती धर्मीयांनी त्यांना प्रगति करू दिली नाही. त्यांना त्यांनी आपल्या समाजात पूर्णत: समाविष्ट करून घेतले नाही. तेथे ही त्यांना अस्पृश्या सारखी वागणुक देण्यात आली. एवढेच नव्हे तर त्यांना आपल्या चर्चमध्येही प्रवेश नाकारला. त्यांच्या करिता वेगळे चर्च उभारावे लागले. मृत्युनंतर ही त्यांना आपल्या कबरस्तानात दफन करू दिले नाही. त्यांच्यासाठी वेगळे कबरस्तान निर्माण करावे लागले. सारांश ख्रिस्ती धर्माच्या स्वीकाराने सुद्धा दलितांच्या समस्यांचे निवारण झाले नाही.

वर्णव्यवस्थे व्यतिरिक्त रंग, वंश, भाषा आदि कारणाने मानव समाजाचे तुकडे झाले आहेत. या सर्व कारणांमुळे मानवी समाज अनेक वर्गात विभागला गेला व त्यांच्यात केवळ दुरावाच नाही तर एकमेंका विरुध्द द्वेष व शत्रुत्वाची भावना सुद्धा निर्माण झाल्याचे प्रत्ययास येते.

अंतिम प्रेषित (पैगम्बर)

ईश्वरीय सृजनात मानवास सर्वश्रेष्ट स्थान प्राप्त आहे. विश्व निर्मितीच्या पहिल्या दिवसापासून ईश्वरीय योजनेनुसार सर्व मानव समाजाने एकाच ईश्वराची पूजा करावी, एकाच प्रेषिताचे (पैगम्बराचे) मार्गदर्शन स्वीकारावे व एकाच प्रकारच्या जीवनपध्दतीचा अवलंब करून कोणत्याच प्रकारच्या भेदभावास थारा देऊ नये. तसेच एकत्रित जीवन व्यतीत करावे आणि पृथ्वी वर आपले श्रेष्ठत्व कायम करावे अशी अपेक्षा होती. परंतु सुरवातीस हे शक्य नव्हते कारण त्या काळात दळणवळणाची साधने उपलब्ध नव्हती. दोन देशांच्या सीमांना लागून समुद्र, पर्वत, वाळवंट वा दाट जंगल होते. त्यामुळे एका देशातून दुसऱ्या देशात जाणे शक्य नव्हते. म्हणून ईश्वराने प्रत्येक देशातील रहिवाश्यांसाठी वेगवेगळ्या प्रेषितांद्वारे आपले आदेश पाठविण्याची व्यवस्था केली. जेव्हा मानव पुरेसा प्रगत झाला तेंव्हा ईश्वराने आपल्या योजनेनुसार सर्व मानव समाजाकरिता एक प्रेषित व एक ईश्वरीय ग्रंथ पाठविण्याचा निश्चय केला त्या योजने करिता तीन बाबी निश्चित करावयाच्या होत्या. १) अंतिम प्रेषितांचे प्रचार केंद्र २) शासक नसलेला देश ३) ईश्वरीय ग्रंथाची सुरक्षिता

१) अंतिम प्रेषितांचे प्रचार केंद्र

जगात एकूण सात महाद्वीप (खण्ड) आहेत मात्र त्या पैकी तीनच एकमेकांशी सलंग्न आहेत. ते म्हणजे आशिया, आफ्रिका व युरोप या तिघांच्या मध्यस्थानी प्रचार केंद्र उभारणे योग्य होते. जगाचा नकाशा पाहता हे लक्षात येते की मध्य पूर्व (Middle East) हेच क्षेत्र तिन्ही महाद्विपात (खण्डात) प्रचारासाठी सर्वात: सोयिस्कर व केंद्र म्हणून योग्य स्थान होते.

२) शासक नसलेला देश

ज्या ज्या देशांत प्रेषित (पैगम्बर) ईश्वरीय आदेशांचा प्रचार करण्यासाठी गेले तेथे अगोदर कोणत्यातरी शासकाचे शासन अस्तित्वात होते. ईश्वराच्या प्रेषिताच्या आगमना ने तो सावध होत असे, कारण ईश्वराच्या प्रेषिताचे प्रचार कार्य यशस्वीरित्या पार पडले तर त्याची राजवट संपुष्टात येण्याची त्याला भीती वाटत होती. प्रेषिताचे आगमन होताच तो विरोध करण्याच्या तयारीत असे. शासकाकडून प्रेषितास नेहमीच त्रास होण्याची शक्यता होती. प्रचार केंद्रास्थानी एखाद्या राजाची राजवट असती तर प्रचार कार्य करणे बरेच कठीण झाले असते.

संपूर्ण मध्यपूर्व क्षेत्रात अरबदेशातच कोणाचीच राजवट नव्हती. संपूर्ण अरब देश छोट्या छोट्या टोळ्यात विभागलेला होता. प्रत्येक टोळीचा एक सरदार असे. ईश्वराने आपल्या अंतिम प्रेषितास अरबस्तानाच्या सुप्रसिध्द शहर मक्का येथील कुरैश टोळीत जन्म दिला. प्रेषित मुहम्मद (स.) वर इतर कोणत्याही टोळीचा सदस्य हात उगारू शकत नव्हता कारण कुरैश टोळी सर्वात मोठी टोळी होती. एवढेच नव्हे तर खुद्द कुरैश टोळीचे लोक सुद्धा त्यांना मारहाण करू शकत नव्हते कारण मुहम्मद (स.) यांचा जन्म कुरैश टोळीच्या सरदाराच्या घरी झाला होता. अशा प्रकारे मुहम्मद (स.) यांना सुरक्षित संधि मिळाल्याने केवळ २३ वर्षाच्या अल्प काळांत त्यांनी ईश्वरीय आदेशानुसार समाज व शासन व्यवस्था निर्माण करून ईश्वरीय जीवन सिध्दांताचा आदर्श लोकांसमोर मांडला.

३) ईश्वरीय ग्रंथाची सुरक्षा

जेंव्हा पासून मानवाने भूतलावर पाय रोवला त्या दिवसापासून त्याच्या मार्गदर्शनासाठी ईश्वराकडून ग्रंथ अवतरित होत राहिले. आरंभ काळांत माणसे सुशिक्षित नव्हती. छपाईची व्यवस्था नव्हती. लोकांना कागद तयार करण्याची कला

अवगत नव्हती. त्यामुळे ईश्वरीय ग्रंथ सुरक्षित राखणे कठीण बाब होती. दुसऱ्या बाजूस समाजात वर्चस्व असलेले काही चतुर लोक होते ज्यांना माहीत होते की ईश्वरीय आदेश अस्तित्वात असल्यास त्यांना जनतेची दिशाभूल करून स्वार्थ साधता येणार नाही. म्हणून ते लोक ईश्वरीय आदेशात फेरबदल करून टाकीत. अशा प्रकारे ईश्वराकडून प्राप्त झालेल्या आदेशांमध्ये समाजातील धूर्त व मुत्सद्दी लोक त्यांत फरक करून त्यांचे मूळस्वरूप नष्ट करीत होते. अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांना पाठविताना अंतिम ईश्वरीय ग्रंथ कसा सुरक्षित राहावा या बाबत योजना आखण्यात आली. आता दुसरा कोणताच प्रेषित येणार (वा पाठविला जाणार) नाही. अशा परिस्थितीत जर अंतिम ईश्वरीय ग्रंथ विकृत झाला तर जगाच्या अंता (कयामत) पर्यंत संपूर्ण मानव समाज अंधारात चाचपडत राहील.

प्रत्येक प्रेषिताला ईश्वरीय आदेशांचा ग्रंथ देण्यात आला होता, परंतु अंतिम प्रेषितांच्या बाबतीत ही पध्दत बदलून संपूर्ण ग्रंथ एकाच वेळी प्रेषितांच्या स्वाधीन करण्याऐवजी वेळोवेळी कुरआनातल्या काही श्लोक (आयती) देववाणी (वही) द्वारा अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याकडे पाठविण्यात आले. ते लेखकांद्वारा त्वरित लिहून घेण्यात आले. सुशिक्षित सहकारी (सहाबा) सुद्धा प्रेषितांना विचारून लिहून घेत मात्र ज्यांना लिहिता वाचता येत नव्हते ते तोंडी पाठ करून घेत असत. अशा प्रकारे थोडे थोडे करून २३ वर्षाच्या कालावधीत संपूर्ण कुरआन प्राप्त झाले. प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याकडे कुरआनची एक लिखित प्रत होती. इतर सहकाऱ्या (सहाबा) नी लिहून ठेवलेल्या प्रति त्यांच्याकडे सुरक्षित होत्या. तसेच हजारो हाफिज सहकार्यांनी कुरआन तोंडपाठ केले होते. अशा प्रकारे कुरआन तीन मार्गाने सुरक्षित करण्यात आले. त्यांत कोणीही परिवर्तन करू शकत नव्हता. त्याच प्रमाणे दरवर्षी रमजान महिन्यांत एक हाफिज कुरआनचे पठण करीत असे व बाकी लोक लक्षपूर्वक ऐकत असत व पठणांत चूक होताच ती दुरुस्त केली जात असे. ही पध्दत आजही जगभर अमलांत आणली जात आहे. थोड्याच काळानंतर कागद तयार करून छपाई करण्याची कला लोकांना अवगत झाली. त्यामुळे आता कुरआनाच्या लाखो प्रती जगात उपलब्ध आहेत. शेकडो वर्षापर्यंत इस्लामी राज्यें अस्तित्वात होती. त्यांनीही कुरआनची सुरक्षा केली. त्यामुळे कुरआनात कोणताच फेरबदल घडून येऊ शकला नाही. कुरआनात बदल घडून आला आहे असे

म्हणणारा एकही व्यक्ती आढळून येणार नाही. कुरआनाव्यतिरिक्त जगातला एक ही ईश्वरीय ग्रंथ पूर्णत: सुरक्षित राहू शकला नाही. बरेच ईश्वरी ग्रंथ शेकडो वर्ष केवळ पाठांतराद्वारे सुरक्षित राखले गेले. काही ग्रंथ अस्तित्वात आहेत मात्र ते कोणत्या प्रेषिता द्वारे प्राप्त झाले हे कळू शकले नाही. काही प्रेषितांची नावे माहित आहेत मात्र त्यांना ईश्वरा कडून कोणते ग्रंथ मिळाले हे कळू शकले नाही. केवळ कुरआनच असे ईश ग्रंथ आहे जे आपल्या मूळ स्वरूपात सुरक्षित आहे व ज्या प्रेषिताद्वारे ते प्राप्त झाले आहे त्यांचे जीवन-चरित्र सुद्धा सुरक्षित ठेवले गेले आहे. अशा प्रकारे कुरआनचे केवळ शब्दच नव्हे, तर त्याचे अर्थ व स्पष्टीकरण सुध्दा सुरक्षित करून ठेवण्यात आले आहे.

विश्वसमाजाची स्थापना

अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांना ईश्वरीय-जीवन-सिध्दांत (दीने इस्लाम) ईश्वरा कडून प्राप्त झाले होते. त्याला अनुसरून त्यांनी व्यक्ती-समाज व प्रशासन व्यवस्था निर्माण केली व दीने इस्लाम प्रत्यक्षात अमलात आणून विश्व-समाजाचा पाया रचला. या जगातून त्यांनी प्रस्थान केल्यावर त्यांच्या नंतर आलेल्या खलीफांनी (खुलफाए-राशेदीनने) जगाच्या बऱ्याच प्रगत राष्ट्रांत दीने-इस्लामचा प्रसार करून तेथे ते प्रस्थापित केले व विश्व समाजाचा अत्यंत सुंदर आदर्श जगासमोर मांडला.

ज्या मानवी समाजात उच्च-नीच व स्पर्शास्पर्शाचे वातावरण अस्तित्वात असेल त्यास खऱ्या अर्थाने मानवी समाज म्हणता येणार नाही. विश्व समाजाचे स्वप्न साकार होण्याकरिता उच्च-नीच व स्पृश्यास्पृश्याची भावना पूर्णत: संपुष्टात आली पाहिजे व जगात सर्व लोकांनी बंधुत्वाच्या भावनेने एकत्रपणे जगायला हवे. म्हणून प्रेषित मुहम्मद (स.) यांनी जाति-भेदाच्या शापा पासून समाजास मुक्त करण्याकडे सर्वाधिक लक्ष दिले. त्यांना माहित होते की जाति-भेदाचा रोग फार जुना आहे व त्यास धार्मिक रंग देण्यात आला आहे. शेकडो वर्षापासून दलित वर्ग अत्यंत दुरावस्थेत जगत आहे. त्याला पायाखाली चिरडले जात आहे. त्यांच्या मध्ये हीनतेची (Inferiority Complex) भावना निर्माण झाली आहे दुसऱ्या बाजूस सवर्ण वर्ग स्वत:स समाजाचा उच्च वर्ग समजत आहे व त्यात श्रेष्ठतेची भावना (Superiority Complex) निर्माण झाली आहे. श्रेष्ठत्वाची भावना असो व हीनतेची भावना, दोहोंना एका झटक्यांत दूर सारता येत नाही. मात्र जोपर्यंत या भावना समूळ नष्ट होत नाही. तोपर्यंत विश्व समाजाची उभारणी करता येत नाही.

जाति-भेदाच्या शापापासून मुक्त करण्याअगोदर सर्व प्रथम लोकांपुढे एकेश्वरवाद, प्रेषिततत्व व पारलौकिक जीवनाचे सिध्दांत मांडण्यात आले. या सिध्दांताच्या समर्थनार्थ संपूर्ण ब्रह्माण्डातील इतकी उदाहरणे मांडण्यात आलीत की तिन्ही सिध्दांत मनात खोलवर रूजले गेले. नंतर या संबंधात ईश्वरीय आदेश लोकांना समजून देण्यांत आले,

"लोकहो आम्ही, तुम्हाला एका पुरुष व एका स्त्री पासून निर्माण केले आणि मग तुमची राष्ट्रे व जाति बनविल्या जेणे करून तुम्ही एकमेकांना ओळखावे. वास्तविकत: अल्लाह जवळ तुमच्यापैकीं सर्वात जास्त प्रतिष्ठित तो आहे जो सर्वात जास्त ईश परायण (सदाचारी) आहे." *(कुरआन सूरह अल्हुजुरात ८४९-१३)*

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी अंतिम हज प्रसंगी दिलेल्या भाषणांत म्हटले होते,

"कोणत्याही अरबास अरबेतरावर (अजमी) तसेच कोणत्याही अरबेतरास (अजमीस) अरबांवर वर्चस्व वा श्रेष्ठत्व प्राप्त नाही. गोऱ्याला काळ्या वर वा काळ्याला गोऱ्यावर श्रेष्ठत्व वा वर्चस्व प्राप्त नाही. श्रेष्ठत्व वा वर्चस्व केवळ पुण्य करणाऱ्यास प्राप्त आहे. वंश परंपरेने कोणालाच मोठेपणा प्राप्त होत नाही."

कुरआनचे आदेश व प्रेषित-वचनांचा विचार केल्यास लक्षात येते की समस्त मानव समाज एकाच वंशापासून निर्माण झाले आहे. विविध जाति-जमाती, वर्ण, भाषा आदिंच्या आधारे मानवांचे विभाजन करणे योग्य होऊ शकत नाही.

कुरआनद्वारे व्यक्त केलेले ईश्वरीय आदेश व प्रेषित मुहम्मद (स.) यांचे उपदेश मानवी बुध्दीवर परिणाम करू लागले तेव्हा शेकडो वर्षापासून बुध्दीवर आच्छादित असलेले चुकीचे विचार वितळून वाहून गेले. ज्यांनी एकेश्वरवाद स्वीकरून प्रेषित मुहम्मद (स.) यांचे प्रेषित्व मान्य केले व कुरआनास ईशग्रंथ म्हणून कवटाळून धरले, त्यांच्या मनात ही भावना दृढ झाली की समस्त मानव समाज एकाच माता-पिता पासून जन्माला आला आहे व सर्वजण एकमेकाचे बंधु आहेत. जन्माच्या आधारावर एक सज्जन व दुसरा दुर्जन कसा होऊ शकतो ?

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी इस्लामच्या आधारावर ज्या समाजाची उभारणी केली होती त्यांत अरब सीरियन, इजिप्शियन, तुर्की, चीनी, हिंदी, स्पार्टन, इंडोनेशियन, आफ्रिकन इत्यादि सर्वच देशातील व वंशातील लोक एकत्र आले होते. हा समाज कुठल्याच एका राष्ट्राचा समाज नव्हता उलट एका विशिष्ट सिध्दांतावर (Ideology) आधारित समाज होता. या समाजात प्रत्येक व्यक्तीस समान दर्जा प्राप्त होता. ते स्नेह व

आपुलकीच्या दोरखंडाने एकत्र जोडले गेले. प्रत्येकाच्या मनात एकच धारणा निर्माण झाली होती की ते सर्व एकाच समाजाचे घटक आहेत. उच्चनीच व स्पृश्य-अस्पृश्याची भावना पूर्णत: लुप्त झाली होती. अशी वैशिष्टये इतर कोणत्याच समाजास प्राप्त झाली नाहीत. हेच इस्लामचे खरे वैशिष्ट मानायला हवे.

इस्लामने लोकांच्या योग्यतेचा आदर केला आहे. मग ते आपल्यातले असोत वा दूसऱ्यातले. इस्लामी समाजाने अशा सर्व लोकांचा पूरेपूर फायदा करून घेतला आहे. अबू हनीफा, शाफई, मालिकी, इब्ने हम्बल, अलखलील, अलकुंदी, अलफराबी, इभेरुश्द आदि विद्वान वेगवेगळ्या समाजातून आले होते. पण सर्वांच्या योग्यतेचा व ज्ञानाचा आदर करण्यात आला व त्यांच्या योगदानाचा इस्लाम समाजाला भरपूर लाभ मिळाला.

ईश्वरीय आदेश व प्रेषित कथनाच्या परिणाम स्वरुपात शेकडों वर्षापासून अस्तित्वात असलेली स्पृश्यास्पृश्याची प्रथा संपुष्टात आली. अरबांचे गुलाम आजच्या दलितांपेक्षाही हीन परिस्थितीत जगत होते. ते बाजारात विकले जात होते. मात्र इस्लामी समाजाच्या प्रभावाने ते समान हक्कास पात्र झाले व उच्च व नीच ही भावना समाप्त झाली.

इस्लामी शासन व्यवस्थेत खलीफाला सर्वश्रेष्ठ स्थान दिले गेले होते. उमर (र.) यांनी जीवनाच्या अंतिम क्षणी सांगितले होते, "जर आज होजेफा (र.) यांचे गुलाम सालिम जीवित असते तर मी त्यांना खलीफा नियुक्त केले असते." सालिम जरी गुलाम होते तरी त्यांचा आदर कमी झाला नव्हता.

विवाह जुळवतांना जात-जमातीची समस्या निर्माण होते. मात्र प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आपल्या आत्ये बहीणीचे लग्न एका गुलामाबरोबर लाऊन दिले होते. या विवाहास समाजाने कोणताच प्रतिकार केला नव्हता.

इस्लामचा प्रसार होण्यापूर्वी मदिना शहराचे लोक स्वत:ला उच्च दर्ज्याचे समजत असत व आपल्या मुलीचे लग्न मक्का शहरातील मुलाशी करीत नसत. एकदा एक मक्का निवासी तरुणाने मदिना शहरातील मुलीशी लग्नाची इच्छा व्यक्त केली. मदिना वाल्यांनी नकार दिला नाही. मात्र लग्नानंतर मुलगी मक्का येथे नांदण्यास जाणार नाही, उलट मुलाला मदिना येथेच स्थायिक व्हावे लागेल अशी अट घातली. या उलट इस्लमाचा मदिना शहरात प्रसार झाल्या नंतर बिलाल (रजि.) यांनी मशीदीत उभे राहून जाहिर केले की मला माझ्या भावाचे लग्न करायचे आहे. मी अरब नाही, अजमी आहे. मी स्वतंत्र नाही गुलाम आहे. मी श्रीमंत नाही, गरीब आहे. इतके सर्व उघड उघड सांगून ही किती तरी मदिना-वासी श्रीमंत लोकांनी हजरत बिलाल (रजि.) यांच्या भावास आपली मुलगी देण्याची तयारी दर्शविली होती.

अमेरिकेतील ''मेल्कम एक्स'' नावाचा प्रसिध्द डॉक्टर इस्लाम स्वीकारल्या नंतर जेव्हा हजयात्रेस गेला तेव्हा त्याने पाहिले की आशिया, युरोप, आफ्रिका, अमेरिका खंडातील विविध वंश व रंगाचे लोक एकाच प्रकारचे वस्त्र धारण करून काबा मशीदीकडे जात आहेत, एकत्र परिक्रमा करीत आहेत, एकत्र नमाज पढत आहेत. एक मुखाने लब्बैक-लब्बैक घोषणा देत आहेत, त्यांच्यात कोणत्याच प्रकारची भेदभावाची भावना दिसून येत नाही. हे सर्व पाहून तो उद्‌गारला **''वंशवाद व वर्णभेद नष्ट करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.''** बरेच गैरमुस्लिम जे पूर्वग्रह दूषित भावनेने विचार करीत नाही, ते मान्य करतात की समाजातील उच्च-नीच, स्पृश्यास्पृश्यता, वर्णभेद व वंशवादाच्या समस्येचे जितक्या यशस्वीरित्या इस्लामने निवारण केले आहे तसे दुसऱ्या कोणत्याच धर्म वा समाज पध्दतीने होऊ शकले नाही.

राज्य व्यवस्था

इस्लामचा प्रसार होण्यापूर्वी जनतेला राज्यकर्त्यांची आलोचना करण्याचा अधिकार नव्हता. शासक व जनता यांच्यातले संबंध मालक व गुलामा सारखे होते. इस्लामी राज्यस्थापन झाल्या नंतर जनतेस शासकाच्या कामकाजावर आलोचना करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला. जगाच्या इतिहासात इस्लामी राज्यात सर्व प्रथम एका सामान्य व्यक्तीने निर्धास्तपणे शासकाची टीका केल्याची घटना घडली. इस्लामी राज्याचे सर्वश्रेष्ठ अधिकारी (खलीफा) उमर फारुक हे खुत्बा (प्रवचन) देण्यास उभे राहिले व बोलू लागले, ''लोकहो, मी जे सांगतोय ते ऐका व त्यावर अंमल करा.'' अचानक श्रोत्या मधून एक सामान्य मनुष्य उभा राहिला व त्याने हरकत घेत म्हटले, ''आम्ही तुमचे भाषण ऐकणार नाही व त्यावर अंमलही करणार नाही. आम्हाला तुमच्या कडून राज्याने वाटप केलेल्या चादरी बाबत खुलासा हवा आहे. आम्हा सर्वांना राज्याकडून एक एक चादर मिळाली होती त्याच्यात आमचा एक सदराही शिवून झाला नाही. मग तुमच्या सारख्या धिप्पाड माणसाचा सदरा एका चादरीत कसा शिवला गेला ? ''हे ऐकूण उमर (र.) आसनावरून खाली उतरले. त्यांनी आपला मुलगा अब्दुल्लाह बिन उमर यांस उत्तर देण्यास सांगितले. मुलाने सांगितले की आज शुक्रवार असल्यामुळे खलीफा यांना प्रवचन द्यावयाचे होते. त्यांचा सदरा फाटलेला होता म्हणून मी माझ्या वाट्याला आलेली चादर त्यांना देऊन टाकली. अशा प्रकारे दोन चादरीत त्यांचा कुर्ता (झबा) शिवला गेला. तोच झबा त्यांनी परिधान केला आहे.'' त्या व्यक्तीचे उत्तराने समाधान झाले. तो म्हणाला ''आता आपण सांगाल ते ऐकू व त्यावर अंमल करू''

खलीफाने त्याला फाशी दिली नाही, तुरुंगात डांबले नाही. की देश सोडण्यास भाग पाडले नाही. लोक खलीफांच्या खुलाशाने संतुष्ट झाले व खलीफाने आपले भाषण सुरु केले.

उमर (रजि.) यांच्या खिलाफतीच्या शासन काळांत इजिप्तचे राज्यपाल उमर बिन आस (र.) यांच्या मुलाने एका इजिप्शियनला चाबकाने झोडपले. या बाबत त्या इसमाने उमर (र.) यांच्या कडे तक्रार नोंदविली. उमर (रजि.) यांनी राज्यपाल व त्यांच्या मुलाला पाचारण केले. ते दोघे हजर झाल्यानंतर त्या इसमाच्या हातात चाबूक देऊन त्यांच्या समक्ष राज्यपालाच्या मुलाला झोडपण्याचे आदेश दिले. त्या इसमाने त्या आदेशानुसार मुलाला झोडपून काढले. नंतर उमर (र.) यांनी त्या इसमास राज्यपालाला सुध्दा एक फटका मारण्याचा आदेश दिला व म्हटले, "ईश्वराची शपथ या मुलाला आपल्या बापा बद्दल घमेंड वाटत नसती तर त्याने तुला कधीच मारले नसते."

इजिप्शियन इसम म्हटला "ज्याने मला मारले, त्यांचा मी बदला घेतला आहे. यावर उमर (र.) राज्यपालाला उद्देशून म्हणाले "ज्यांनी आईच्या पोटी स्वतंत्र नागरिक म्हणून जन्म घेतला आहे अशा नागरिकांना तुम्ही कधी पासून गुलाम समजू लागला आहात.?"

इस्लामी शासनाच्या गौरवशाली काळात स्वत: खलीफा विरुध्द दावे केले जात होते व खलिफाला न्यायालयात जातीने हजर राहावे लागत असे. खलीफाला जर एखाद्या विरुध्द नाराजी झाली असेल तर आपल्या अधिकाराचा उपयोग न करता न्यायलयात फिर्याद दाखल करुन न्याय मिळवावा लागत असे.

इस्लामचा प्रसार होण्यापूर्वी एखाद्या मोठ्या माणसाने गुन्हा केल्यास त्याला सोडून देण्यात येत असे व एखाद्या गरीब व सामान्य माणसाने गुन्हा केल्यास त्याला शिक्षा ठोठावली जात असे. इस्लाम प्रस्थापित झाल्या नंतरची एक घटना अशी आहे की एका मोठ्या घराण्यातील मुलीने चोरी केली. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी तिचे हात कलम करण्याचे आदेश दिले. लोकांनी त्यांना विनंति केली की तिचे हात कलम करण्यात येऊ नये कारण ती प्रतिष्ठित घराण्यातील मुलगी आहे. प्रेषित मुहम्मद (स.) नाराज झाले. ते म्हणाले पूर्वी प्रतिष्ठित लोक गुन्हे करून सुद्धा मुक्त केले जात होते मात्र सामान्य माणसाला त्याच्या गुन्ह्याची शिक्षा दिली जात होती. म्हणूनच तो समाज नेस्तनाबूद झाला. जर माझी मुलगी फातिमा (र.) हिने चोरी केली असती तर मी तिचे ही हात कलम करण्याचा आदेश दिला असता.

मानव अधिकार : (Fundamental Human Rights)

जगातील छोट्याछोट्या तुकड्यांत विखुरलेल्या समाजातील लोकांना एकत्रित आणून एका 'विश्वसमाजा' ची निर्मिती करणे ही अत्यंत सुंदर कल्पना आहे, मात्र त्या समाजाच्या प्रत्येक व्यक्तीस त्याचे मानवी हक्क प्राप्त होत नसतील तर अशा काल्पनिक वा स्वप्नमयी समाजाचा काय उपयोग ? समाजाच्या प्रत्येक व्यक्तीस त्याचे मानवी हक्क प्राप्त करून देण्यास अग्रक्रम देऊनच विश्वसमाजाची यशस्वीरित्या उभारणी करता येते.

आज पाश्चात्य देश दावा करतात की त्यांनी जगाला मानव-अधिकार प्राप्त करून दिले आहेत. इंग्लंडच्या मॅग्नाकार्टा (Magna Carta) फ्रांसची क्रांति व संयुक्त राष्ट्र परिषदांने मानवीअधिकारांसाठी केलेल्या प्रयत्नांचा इतिहास दोनतीनशे वर्षा पेक्षा जास्त नसेल व त्यांच्या प्रयत्नांना तर नाममात्र यश प्राप्त झाले आहे. त्यांच्या प्रयत्नांना कोणत्याच शक्तीचे पाठबळही प्राप्त नाही. खरे सांगायचे म्हणजे ज्या ज्या वेळी ते मानव अधिकाराच्या गोष्टी करतात, त्या त्या वेळी त्यांच्या मनांत त्यांच्या शहरातील लोकांचे त्यांच्या समाजातील सदस्यांचे वा गोऱ्या कातडीच्या लोकांच्या हित रक्षणाची चिंता चुळबुळ करीत असते. जगातील सर्वसामान्य माणसाचे हित त्यांनी कधीच जोपासले नाही. एंखादा मानवतावादी ठराव सम्मत झाला तरी त्यांचा प्रत्यक्ष फायदा लोकांपर्यंत पोहचू शकला नाही.

इस्लाम १४०० वर्षा पूर्वी अशा समाजाची स्थापना करू शकला आहे ज्याच्या आधारे संपूर्ण मानवजातीस मानव अधिकार प्राप्त होऊ शकले आहेत. त्याचे मूळ कारण असे की जी व्यक्ती ईश्वर, ईश्वराचे प्रेषित व मरणोपरांत जीवनावर विश्वास ठेवते, ती मानवी अधिकारांचा आदर व अवलंब करण्यास कधीच नकार देत नाही.

सर्व प्रथम मानवास जगण्याचा अधिकार दिला गेला पाहिजे. युरोपातील गोऱ्यांनी आस्ट्रेलिया खण्डातील मूळ रहिवाश्यांची शिकार करून त्यांचा संपूर्ण नायनाट केला. हे साऱ्या जगाला ठाऊक आहे. मूळ निवासी लोकांना ठार करून गोऱ्या समाजाची आस्ट्रेलियात वसाहत करण्यात आली. तसेच उत्तर अमेरिकेतील रेड इंडियन्स ना ठार मारून टाकण्यात आले व जे थोडे फार जीवित राहिले, त्यांना एका छोट्याशा क्षेत्रास बंदिस्त करण्यात आले. याच गोऱ्या लोकांनी आफ्रिका खण्डातील काळ्या निग्रोंची शिकार करून त्यांना बंदिस्त केले होते.

केवळ इस्लामने मानवाला जगण्याचा अधिकार मिळवून दिला आहे. इस्लामी तत्वानुसार प्रत्येक माणसाला जगण्याचा अधिकार प्राप्त आहे. कुरआनात म्हटले आहे,

''ज्याने एखाद्या माणसाला खुना बद्दल अथवा पृथ्वीवर उपद्रव पसरविण्या व्यतिरिक्त अन्य कारणाने ठार केले असेल तर त्याने जणू काही सर्व मानवांना ठार केले (असे मानायला हवे), आणि ज्याने एखाद्याला जीवदान दिले असेल त्याने जणू काही सर्व मानवजातीला जीवदान दिले (असे मानायला हवे)'' *कुरआन* - ५ : ३२

''कोणाचीही हत्या करू नका ज्याला अल्लाहने निषिध्द ठरविले आहे. परंतु जे सत्यानिशी (अपेक्षित आहे).'' *कुरआन* - १७:३३

इस्लामने मानवास हा मानवी हक्क दिला आहे. मग तो कोणत्याही समाजाचा असो. आपल्या समाजाचा असो वा विरोधी समाजाचा असो, आपल्या धर्माचा असो वा परधर्मीय असो. माणूस या नात्याने जगण्याचा त्याला अधिकार आहे. इस्लाम धर्मानुसार एखाद्यास ठार करणे जितके महापाप आहे तितकेच एखाद्यास जीवदान देणे महापुण्य आहे. कोणी आजारपणामुळे मृत्युशी झुंज देत असेल वा भूक व तहान ने मृत्युमुखी पडत असेल वा पाण्यात बुडून मरत असेल, तर त्याचा जीव वाचविणे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे.

''व ज्यांचा मालमत्तेत हक्क आहे मागणाऱ्याचा व जे वंचित राहून गेलेत''

कुराआन ७० : २४-२५

''अल्लाहच्या प्रेमात गरीब व अनाथ व कैद्याना जेवू घालतात.'' *कुरआन* ७६ : ८

इस्लाम धर्मात महिलेच्या चारित्र्य व नारित्वाच्या सुरक्षेचा हक्क तिला देण्यात आला आहे. केवळ इस्लाम धर्माने महिलांना हा अधिकार दिला आहे. इस्लामनुसार बलात्कार महापाप मानले गेले आहे व त्या करिता अत्यंत कडक शिक्षा निश्चित करण्यात आली आहे. जगातील बहुतेक कायद्यांनुसार दोहोंच्या परस्पर सम्मतीने शरीर संबंध झाल्यास त्यास गुन्हा मानला जात नाही. विवाहित महिलेशी संभोग केल्यास त्यास बलात्काराची शिक्षा न देता आपसातील विवाहा संबंधित करारभंगाची शिक्षा दिली जाते ही कायदेशीर तरतूद केवळ इस्लाम ने केली आहे.

या व्यतिरिक्त इतर अनेक अधिकार सुद्धा महिलांना देण्यात आले आहेत व जे प्रत्यक्षात अमलांत आणले जात आहेत.

सामाजिक न्याय (Social Justice)

विश्वसमाजाची निर्मिती करणे तर सोपी बाब आहे मात्र समाजातील व्यक्तीला जर सामाजिक न्याय मिळत नसेल तर असा विश्वसमाज किती दिवस अस्तित्वात राहू शकतो ?

इस्लाम सामाजिक न्यायाची हमी देतो. जे लोक म्हणतात की इस्लाम धर्मातही सामाजिक न्याय नाही ते चुकीचे विधान करतात. इस्लाम मध्ये नक्कीच सामाजिक न्याय अस्तित्वात आहे. इस्लाम ईश्वराने मानवाच्या मार्गदर्शनासाठी पाठविलेला धर्म आहे. न्याय व अन्याय म्हणजे काय व तो कसा कायम करायचा हे निश्चित करणे मानवाचे काम नसून ते ईश्वराच्या अधिकाराची बाब आहे. न्याय व अन्यायाची रचना करणे मानवाच्या अधिकारात नसून मानव मानवाचा मालक बनू शकत नाही. या विश्वात त्याचे अस्तित्व ईश्वराच्या प्रजे समान आहे. म्हणून न्यायाची तत्वें निश्चित करणे त्याचा अधिकार नसून तो ईश्वराचा अधिकार आहे.

"आम्ही आपल्या प्रेषितांना अगदी स्पष्ट संकेत व सूचनांसहित पाठविले आहे आणि त्यांच्यासह ग्रंथ व तुला (तराजू) उतरविली जेणे करून लोकांनी न्यायाधिष्ठित व्हावे."

-कुरआन ५७ - २५

न्याय ईश्वर व त्याच्या प्रेषिता व्यतिरिक्त कोणा कडे नाही. खरे म्हणजे **'इस्लाम म्हणजेच न्याय होय.'**

फ्रासंच्या क्रांति (French Revolution) ने व्यक्तीला इतके जास्त अधिकार प्राप्त करून दिले की संपूर्ण राज्य व्यवस्था त्याच्या हातातले खेळणे झाले. त्यामुळे जनतेला न्याय मिळेनासे झाले. या उलट कम्युनिझम ने शासक वर्गास इतके सबळ करून टाकले की वैयक्तीक जीवन यंत्रागत झाले. समाज न्यायास मुकला. मात्र इस्लामने व्यक्ती व शासन व्यवस्थेत संतुलन निर्माण केले. व्यक्तीस इतके स्वातंत्र्य देण्यात आले नाही की तो शासन व्यवस्थेत अडथळे निर्माण करू शकेल व शासन व्यवस्था ही इतकी बेछूट सशक्त झाली नाही की ती राज्यातील नागरिकांना अधिकारहीन करून त्यांना बाहुल्या समान वागवू शकेल. सारांश इस्लामने जगात न्यायोचित समाज व्यवस्था प्रस्थापित केली.

इस्लामने विविध देशातील, वेगवेगळ्या समाज, वंश व वर्णाच्या लोकांना एकत्र आणले. सर्वांना समान दर्जा प्रदान केला. प्रत्येक व्यक्तीस मूलभूत हक्क प्राप्त करून दिले

व सामाजिक न्याय प्रस्थापित केले. सर्वच क्षेत्रात शांतता निर्माण झाली. सर्व लोक बंधुभावाने जीवन व्यतीत करू लागले. शासकीय अधिकारी जनतेचे सेवक म्हणून व्यवस्था पाहत होते व नागरिकांना अधिकाऱ्यांच्या दुर्व्यव्हारा विरुध्द तक्रार करण्यांचा अधिकार प्राप्त झाला होता.

या सर्व बाबीस इतिहास साक्ष आहे. त्या सत्यस्थितीच्या अध्ययना नंतर काही विद्वान व महापुरुषांनी खालील प्रमाणे आपले विचार व्यक्त केले आहेत.

महात्मा गांधी यांनी म्हटले होते जेव्हा आपला देश स्वतंत्र होईल, तेव्हा आपण सुद्धा माननीय अबू बक्र सिद्दिक व माननीय उमर फारूक यांनी कायम केलेल्या राज्यव्यवस्थेचे अनुकरण करू.

जयप्रकाश नारायण यांनी पटणा मेडिकल कॉलेजच्या राजेंद्र प्रसाद हॉल मध्ये प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या जीवना बाबत बोलतांना म्हटले होते, "जगातील मुस्लिम जर अज्ञानाच्या आवरणातून बाहेर येऊन इस्लामी तत्वांचा पूर्णपणे अंगीकार करून जीवन व्यतीत करतील तर सारे जग इस्लाममय होऊ शकेल."

रविंद्रनाथ टागोर ज्यांनी राष्ट्रगीताची रचना केली आहे, ते म्हणतात, "अत्यल्प काळात इस्लामच्या सत्यप्रवण अध्यात्मिक तत्वांचे सर्वत्र प्रस्थ निर्माण होईल. हिंदू धर्म ही प्रभावित होईल व भारतात सर्वांचा एकच धर्म असेल तो म्हणजे इस्लाम धर्म होय."

बर्नाडशॉ ने म्हटले होते, "येत्या शंभर वर्षात संपूर्ण जगात इस्लामचा प्रसार होईल, पण त्या इस्लामचे स्वरुप आजच्या मुस्लिमांच्या इस्लामसारखे नसून, प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या काळातील मुस्लिमांच्या आचार-विचारा सारखा असेल."

नेपोलियन बोनापार्ट ने म्हटले आहे, "मला विश्वास आहे की नजीकच्या काळात मी इतका समर्थ होईन की जगातील सर्व विद्वान व सुशिक्षित (सूज्ञ) लोकांना एकत्रित करून त्यांच्या मदतीने कुरआनाच्या आधारावर अशी राज्य व्यवस्था स्थापित करीन की ज्यामुळे सत्य व मानवतावादाचा अवलंब सुकर होऊ शकेल."

ईश्वरीय जीवन सिध्दांवर आधारित समाज विस्कळित झाला.

इस्लाम अनुसार स्थापित केलेला विश्वसमाज यशस्वीरित्या वाटचाल करीत होता. पण अचानक इस्लामी समाज व्यवस्था विस्कळित झाली व संपूर्ण विश्वसमाज अस्तव्यस्त झाला.

असे का घडले ? ईश्वरालाच ठाऊक ! मात्र एवढे सांगता येईल की ईस्वराच्या आज्ञे शिवाय झाडाचे एक पान ही हालत नाही. तसेच ईश्वराची मर्जी निरर्थक नसते. ती विशिष्ट योजने अंतर्गत असते व ईश्वरीय योजना दीर्घ कालीन असते.

मानवी स्वभावातला एक दुर्गुण आहे. जी बाब त्याला सहजरित्या प्राप्त होते त्याची तो किंमत करीत नाही. इस्लाम त्याला सहजरित्या प्राप्त झाला. विश्वसमाजाची आपोआप स्थापना झाली व कार्यरत ही झाली. त्यामुळे कालांतराने त्या बाबतची आस्था ओसरत गेली.

धर्म ही एक आवश्यक बाब आहे व त्याच्या शिवाय समाजाची गाडी पुढे जाऊच शकत नाही. मानव स्वबुध्दीचा वापर करून आपल्या मर्जीनुरुप धर्म (समाज व्यवस्था) निर्माण करण्याचा प्रयत्न करतो मात्र त्याने निर्माण केलेली समाज व्यवस्था वा धर्म कधीच यशस्वी होणार नाही. मानव पथभ्रष्ट होईल. त्याच्या समस्यांचा गुंता वाढेल. सर्वत्र अत्याचाराचे व अन्यायाचे वातावरण निर्माण होईल. जेव्हा सर्वत्र नैराश्याचे अंध:कार पसरेल, तेव्हा मानवाला इस्लाम आठवेल व खऱ्या अर्थाने इस्लाम बाबत त्यांच्या मनांत श्रध्दाभाव निर्माण होईल.

असे मानले जाते की मनुष्य आपल्या बौध्दिक क्षमता व दुसऱ्यांच्या संपत्ती बाबत उचित अंदाज लाऊ शकत नाही. जेव्हा इस्लामी समाज व्यवस्था विस्कळित झाली तेव्हा जगातील विद्वानांना वाटले की ते त्यांच्या बुध्दीचा वापर करून उत्तम जीवन पध्दतीचा अविष्कार करू शकतात. अनेक बुध्दिमानांनी व्यक्ती-स्वातंत्र्य (Individual Liberty) उदारमतवादाच्या आधारावर भांडवलशाही, धर्म निरपेक्ष गणतंत्र समाजव्यवस्थेची स्थापना केली. या समाज व्यवस्थेची खूप स्तुति करण्यात आली. लोकांना वाटू लागले की ही सर्वोत्तम समाज व्यवस्था असून तिच्या द्वारे मानव उन्नतिच्या चरम सीमेला पोहचू शकेल. पण अल्प काळातच संपूर्ण समाज व्यवस्था कोलमडून पडली सर्वत्र अन्याय, अत्याचार व संघर्षाचे वातावरण निर्माण झाले.

या मानवनिर्मित जीवनपध्दतीच्या अपयशाने बुध्दीजीवी लोकांचा भ्रमनिराश झाला. किन्तु ते हतबल झाले नाहीत. त्यांनी सामाजिक न्यायाच्या आधारावर दुसऱ्या जीवन पध्दतीची निर्मिती केली. त्या जीवन पध्दतीस कम्युनिझम असे नांव देण्यात आले. या जीवन पध्दती करिता एक वेगळाच मार्ग स्वीकारण्यात आला. ज्या क्षेत्रात ही जीवन पध्दत लागू करण्यात आली त्या क्षेत्रास जगाच्या दुसऱ्या क्षेत्रांपासून अलिप्त

करण्यात आले. क्षेत्रांची अंतर्गत माहिती बाहेर जाऊ दिली जात नव्हती व बाहेरील जगाची वार्ता आत येऊ दिली जात नव्हती. खाजगी मिळकती मुळे सामाजिक समस्या निर्माण होतात म्हणून कम्युनिझमने खासगी संपत्ती व मिळकत संपुष्टात आणली. जमीनदाराच्या जमीनी व कारखानदाऱ्यांचे कारखाने राज्याची मिळकत झाली. सर्व नागरिकांना समान करण्यात आले. कम्युनिष्ट राष्ट्र जगात स्वर्गा समान आहेत असे भासविण्यात आले. ही जीवन पध्दत शंभर वर्ष ही टिकू शकली नाही. रशिया मध्ये ही जीवन पध्दत (समाज व्यवस्था) जन्माला आली व तेथेच ती गाडली गेली.

रशिया व अमेरिकेने जगात महाशक्ती (Super Power) चे स्थान प्राप्त करून जगातील इतर राष्ट्रांचा छळ सुरू केला. दोन्ही महाशक्ती एकमेकाचा विरोध करीत होते. जगातील छोट्या छोट्या राष्ट्रांचे अस्तित्व दोन्ही महाशक्ती मुळे संकटात सापडले होते. जेव्हा रशिया एखाद्या छोट्या राष्ट्रास हडप करण्याचा प्रयत्न करत असे तेव्हा ते राष्ट्र अमेरिकेचे शरण घेई व अमेरिकेने जोर जबरदस्ती केल्यास कमकूवत राष्ट्र रशियाच्या आश्रयास जात असे. सर्वच छोटी राष्ट्रे दोन्ही महाशक्तीच्या अत्याचाराने त्रस्त झाले होते.

आता अमेरिका एकुलती एक जागतिक महाशक्ती अस्तित्वात आहे. अमेरिकेच्या अत्याचार व अन्याया पासून सुरक्षित राहण्यासाठी कमकूवत राष्ट्रांना कोणाचाच आधार राहिलेला नाही.

ज्या काळात जमीनदारी व सामंतशाही अस्तित्वात होती त्या काळी प्रजा अत्यंत दीन हीन परिस्थितीत होती. दिवसभर मेहनत मजूरी केल्यानंतर सायंकाळी मालकाकडून धान्याच्या स्वरूपात मिळालेली संपूर्ण मजूरी सुध्दा घरी पोहचू दिली जात नव्हती. मजूराचे कपडे इतके फाटलेले असत की त्यातून निम्मे धान्य रस्त्यातच सांडले जात असे. आज अमेरिका याच तत्वाचा उपयोग करीत आहे. सारेच कमजोर देश अमेरिकेच्या अत्याचाराचे शिकार होत आहेत. एखाद्याने डोके वर करण्याचे प्रयत्न करताच त्याला लगेच ठेचून टाकले जाते. या अत्याचारी परिस्थितीतून बाहेर पडण्याचा कोणताच मार्ग सापडत नाही. चोहों बाजूस निराशाजनक वातावरण निर्माण झाले आहे. आता लोकांना महात्मा गांधी, जयप्रकाशनारायण व रविंद्रनाथ टागोरांचे उदगार आठवत आहेत. त्यांनी म्हटले होते की मानवाने स्थापित केलेल्या जीवन पध्दतीत (धर्मात) अन्याय व अत्याचारच दिसून येतो. ईश्वरीय जीवन - सिध्दांता (इस्लाम) द्वारेच मानवाचे कल्याण साधता येईल.

इस्लामचे पुनरुत्थान

पूर्वी लोक जगाचा कोणी तरी सृजनकर्ता आहे असे मानण्यास तयार नव्हते. हे विश्व आपोआप तयार झाले आहे व आपोआप चालत आहे असे मानत. अशा परिस्थितीत जगात इस्लामचा कोणीच स्वीकार करीत नव्हता. त्यामुळे समाजाच्या निर्मितीचा प्रश्नच निर्माण होत नव्हता. आज जगाचे स्वरुपच पार बदलून गेले आहे. आज जगातील बहुतांश सुशिक्षित समाज मान्य करतो की जगाचा कोणीतरी सृजनकर्ता (निर्माता) आहे. प्रत्येक सामाजिक गटाने त्या अज्ञात शक्तीला वेगवेगळे नांव दिले आहे. जरी नाव वेगवेगळे असले तरी जगाचा निर्माता एकच आहे. हे सत्य मान्य केले जाते. ही अत्यंत समाधानाची बाब आहे. विश्व समाज निर्मितीची येथूनच सुरुवात होत आहे असे मानायला हरकत नाही. विश्वसमाजाच्या निर्मितीच्या दिशेने हे पाहिले पाऊल मानायला हवे.

कुरआनच्या अगोदर मानवाच्या मार्गदर्शनासाठी वेळोवेळी ईश्वरीय ग्रंथ येत होते. मात्र त्यापैकी एक ही सुरक्षित राहिला नाही. त्या ग्रंथामध्ये मानवी विचारांचे एवढे मिश्रण झाले आहे की, त्या ग्रंथाचे मूळ स्वरूप व मूळ संदेशच लुप्त झाले आहेत.

एका पंडिताने 'वेद' च्या बाबतीत म्हटले आहे, ''चिमूटभर साखरेत पायलीभर मीठ मिश्रित करण्यात आले आहे.'' मात्र कुरआन एक असा ग्रंथ आहे जो आपल्या मूळ स्वरूपात सुरक्षित आहे असे छाती ठोकपणे सांगता येते.

'कुरआन' सुरक्षित ग्रंथ आहे या बद्दल मुळीच दुमत नाही. मात्र ते ईश्वरीय ग्रंथ आहे, हे सत्य लोक अद्याप स्वीकारण्यास काकू करीत आहेत. खरे म्हणजे कुरआन ईश्वरीय ग्रंथ आहे हे मान्य करणेच महत्वाची बाब आहे. विश्वसमाजाच्या निर्मितीसाठी कुरआन ईश्वरीय ग्रंथ आहे हे सत्य स्वीकारणे अत्यंत महत्वाचे आहे. ज्या ईश्वराने विश्वाची निर्मिती केली त्याच ईश्वराने मानवी जीवनाच्या मार्गदर्शनासाठी कुरआन पाठविले आहे व त्यानेच ते सुरक्षित ठेवले आहे हे निर्विवाद सत्य लोकांनी स्वीकारायला हवे.

'कुरआन' प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या द्वारे जगाला प्राप्त झाले आहे, हे जगास माहित आहे. मुहम्मद (स.) यांचे प्रेषितत्व मान्य करणे, विश्व समाजाच्या निर्मिती साठी तीसरी अट आहे.

ईश्वर, अंतिम ईश्वरीय ग्रंथ (कुरआन) व अंतिम ईश-प्रेषित मुहम्मद (स.) या तीनही सत्य बाबींना मान्य करणे विश्वसमाज - निर्मिती करिता अत्यावश्यक तत्वें आहेत.

जो पर्यंत ईश्वरीय जीवन सिध्दांत (इस्लाम) स्थापित होत नाही, तो पर्यंत विश्वसमाजाचा पाया रोवला जाऊ शकत नाही. दुर्दैवाची बाब अशी की मुस्लिम समाज सुध्दा इस्लामला एक 'धर्म' मानत आहे. जो पर्यत जगातले लोक इस्लामला 'जीवन-पध्दत' (दीन) मानत नाही, तो पर्यंत इस्लामला जीवन शैलीच्या स्वरुपात स्थापित करता येणार नाही.

इस्लामी राज्ये उध्वस्त झाल्यानंतर सर्वत्र हुकुमशाही व दडपशाहीचे वातावरण निर्माण झाले आहे. इस्लाम म्हणजे 'नमाज व रोजा' असा सीमित अर्थ रूढ झाला आहे. जगाला वाटू लागले आहे की इस्लाम हा सुध्दा एक सामान्य धर्म आहे. म्हणूनच आता जगात सर्वत्र इस्लामला 'दीन' या अर्थाने प्रस्थापित करण्याचे एकत्रित व संगठित प्रयत्न सुरु झाले आहेत. हे शुभसंकेत मानायला हवे.

जोवर अशा आदर्श विश्वसमाजाच्या निर्मिती साठी समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातून काही लोक पुढाकार घेणार नाहीत तो वर हे सारे वर्णन पुस्तकाच्या शोभे पुरतेच राहील. हे ही तितकेच खरे आहे की जोवर असा आदर्श समाज निर्माण होत नाही, मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनातील दुष्ट प्रवृत्तींचा कायमस्वरूपी विनाश शक्य होणार नाही. आता वेळ चालून आली आहे, आपण सर्वांनी आपापसातले मतभेद बाजूस सारून दीने इस्लामच्या मूळतत्वांचा व प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या आदर्शांचा प्रचार व प्रसार करून काटेरी समाजास उद्यानाचे आकर्षक स्वरूप देण्यासाठी व आपले ऐहिक व पारलौकिक जीवन सफल करण्यासाठी तन, मन, धनाने प्रयत्नशील व्हायला हवे असे आवर्जून सांगावसे वाटते.